# अभ्युदय को-ऑप. बँक लि.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

नोंदणीकृत कार्यालय: ३६/२५१२, अभ्युदय नगर, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ४०००३३.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की **अभ्युदय को-ऑप बँक लिमिटेडची ६३वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २४ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता, यशवंत नाटयमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१६** येथे घेण्यात येणार आहे.

सभेपुढील कामकाजाचे विषय खालीलप्रमाणे आहेत.

१. दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन व तो कायम करणे.

२. दिनांक ३१ मार्च २०२६ वर्ष अखेरचा लेखापरिक्षित ताळेबंद व नफातोटा पत्रक, प्रशासक मंडळाचा अहवाल व वैधानिक लेखा परीक्षकांचा अहवाल स्वीकृत करणे.

३. २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालावर (LFAR) विचार करणे.

४. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रिझर्व्ह बँकेच्या मंजूरीस अधीन राहून वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करण्याचे आणि त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार प्रशासक मंडळास देणे.

५. ६३ व्या वर्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती मान्य करणे.

६. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

**मा.प्रशासक मंडळाच्या आदेशावरुन**

**स्थळ : मुंबई** — **बरुण आर. जी. उपाध्याय**

**दिनांक : ७ सप्टेंबर, २०२६** — **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**टिप :-**

१. सभेच्या नियोजित वेळेपासून अर्ध्या तासात आवश्यक ती गणसंख्या नसेल तर सभा उपविधी क्रमांक ३१ (iii) नुसार तहकूब करण्यात येईल व अशी तहकूब केलेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी १०:३० वाजता घेण्यात येईल व त्या सभेमध्ये कामकाजाचे दिलेले विषय हाताळण्यात येतील. त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२. सभासदांना वार्षिक जमाखर्च / ताळेबंद पत्रकासंबंधी कोणत्याही प्रकारची माहिती हवी असल्यास त्यांनी तसे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना के. के. टॉवर, जी. डी. आंबेकर मार्ग, परेल व्हिलेज, मुंबई - ४०० ०१२ येथे दिनांक १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत लेखी कळवावे, जेणेकरुन आवश्यक माहिती उपलब्ध करुन देता येईल.

३. वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांनी ओळखीचा पुरावा म्हणून मूळ सदस्यत्व ओळखपत्र किंवा खालीलपैकी कोणतेही एक अधिकृत मूळ दस्तऐवज (OVD) - आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट, वाहन चालविण्याचा परवाना, मतदार ओळखपत्र, नरेगा जॉब कार्ड त्याची प्रत सोबत बाळगणे आवश्यक आहे.

४. ज्या सभासदांनी अजूनही सदस्यत्वाचे ओळखपत्र प्राप्त केले नसेल त्यांनी आपले दोन आयकार्ड आकाराचे फोटो (३से.मी.X२ से.मी.) शेअर डिपार्टमेटमध्ये जमा करुन आपले ओळखपत्र प्राप्त करुन घ्यावे.

५. वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या अधिकृत वेबसाइट वर उपलब्ध आहे.